Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

| **B** |
|---|

# Paper-III
# COMMERCE

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ......................................

(Name) ..............................................

2. (Signature) ......................................

(Name) ..............................................

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 50317

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# COMMERCE
## Paper III
# वाणिज्य
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Societal marketing concept gives more importance to .................... .
   (A) Customer satisfaction
   (B) Profits for the company
   (C) Domination of competitors
   (D) Welfare and well-being of the society

1. सामाजिक विपणन संकल्पना ही ................ याला अधिक महत्त्व देते.
   (A) ग्राहकांचे समाधान
   (B) कंपनीला होणारा नफा
   (C) स्पर्धकांचे दमन
   (D) समाजाचे कल्याण आणि उन्नती

2. A person's consistently favourable or unfavourable evaluation, feelings and tendencies towards an object or idea is called as ...................... .
   (A) Motive
   (B) Attitude
   (C) Belief
   (D) Perception

2. एखाद्या व्यक्तीच्या एखाद्या वस्तू किंवा कल्पने-बाबत असणाऱ्या सातत्यपूर्ण सकारात्मक अथवा नकारात्मक भावना, पडताळणी आणि कल याला ................ असे म्हणतात.
   (A) हेतू
   (B) वृत्ती
   (C) विश्वास
   (D) समज

3. Which statement of the following is *not* correct ?

(A) Green consumers purchase the products which are eco-friendly

(B) Green consumers purchase the products which are packed in green coloured papers only

(C) Green consumers purchase the products which are re-cycled products

(D) Green consumers purchase the products which are not prepared from threatened species

3. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) हरित उपभोक्ते पर्यावरणपूरक वस्तू खरेदी करतात

(B) हरित उपभोक्ते फक्त हिरव्या रंगाच्या कागदाचे वेष्टण असलेल्या वस्तूच खरेदी करतात

(C) हरित उपभोक्ते पुनर्वापर केलेल्या वस्तूंची खरेदी करतात

(D) हरित उपभोक्ते दुर्मीळ प्रजातींपासून तयार केलेल्या वस्तूंची खरेदी करत नाहीत

4. In new product development process, when new product is launched on trial basis in a small geographical area, it is called as ..................... .

(A) Test marketing

(B) Product marketing

(C) Company testing

(D) Policy Testing

4. नवीन वस्तू विकास प्रक्रियेमध्ये जेव्हा नवीन वस्तू प्रायोगिक तत्त्वावर लहान भूभागामध्ये सादर केली जाते, तेव्हा त्याला ................ असे म्हणतात.

(A) चाचणी विपणन

(B) वस्तू विपणन

(C) कंपनी चाचणी

(D) धोरणांची चाचणी

5. Which of the following factors does *not* influence a dividend policy ?

(A) Liquidity position of a company

(B) Market value of share

(C) Legal restrictions

(D) Size of business

6. From the following information, calculate the combined leverage :

Sales ₹ 10,00,000,

Variable Cost ₹ 4,00,000,

Fixed Cost ₹ 2,00,000,

Interest ₹ 40,000,

Tax Rate @ 30%.

(A) 1.67

(B) 1.50

(C) 1.11

(D) 1.35

7. Capital structure designing has nothing to do with .................. .

(A) Profitability

(B) Flexibility

(C) Corporate Governance

(D) Liquidity

5. खालीलपैकी कोणत्या घटकांचा लाभांश धोरणावर प्रभाव पडत **नाही** ?

(A) कंपनीची रोख प्रदता परिस्थीती

(B) भागांचे बाजारमूल्य

(C) कायदेशीर बंधने

(D) व्यवसायाचा आकारमान

6. खालील माहितीवरून एकत्रित गुणोत्तर काढा :

विक्री ₹ 10,00,000,

बदलता परिव्यय ₹ 4,00,000,

स्थिर परिव्यय ₹ 2,00,000,

व्याज ₹ 40,000,

कर दर @ 30%.

(A) 1.67

(B) 1.50

(C) 1.11

(D) 1.35

7. ................ याचा भांडवल संरचना आराखड्याशी कसलाही संबंध नाही.

(A) लाभप्रदता

(B) लौचिकता

(C) कंपनी प्रशासन

(D) रोख प्रदत्ता

8. According to $\frac{D}{P}$ approach, if the market price of equity shares of a company (Face value ₹ 10) is ₹ 15 and dividend rate is @ 20%, cost of equity shares will be ................ .

(A) 20%

(B) 15%

(C) 13.3%

(D) 12.5%

8. $\frac{D}{P}$ या दृष्टिकोनानुसार एका कंपनीच्या सामान्य भागाचे (दर्शनी किंमत ₹ 10) बाजारमूल्य ₹ 15 असून लाभांश दर 20% असेल तर सामान्य भागाचा परिव्यय दर .................... हे आहे.

(A) 20%

(B) 15%

(C) 13.3%

(D) 12.5%

9. When a manager follows an interview guide but also asks other questions, what type of interview is being used by him ?

(A) A structured interview

(B) A semi-structured interview

(C) An unstructured interview

(D) An open interview

9. जेव्हा व्यवस्थापक मुलाखतीची मार्गदर्शिका वापरतात पण त्याचबरोबर इतर प्रश्नही विचारतात तेव्हा ते कोणत्या मुलाखत प्रकाराचा वापर करतात ?

(A) संरचित मुलाखत

(B) अर्धसंरचित मुलाखत

(C) असंरचित मुलाखत

(D) खुले मुलाखत

10. Provisions relating to strike and lock-out in industrial organisations are there in the :
    (A) Payment of Wages Act
    (B) Industrial Disputes Act
    (C) Minimum Wages Act
    (D) Factories Act

11. Which of the following is *not* included in the model for formulating a career strategy ?
    (A) Assessment of personality traits
    (B) Implementation of the career plan
    (C) Long-range personal and professional goals
    (D) Personal profile

10. औद्योगिक संघटनातील संप व ताळेबंदी संबंधीच्या तरतूदी ................ कायद्यात आहेत.
    (A) वेतन देय (Payment of Wages Act)
    (B) औद्योगिक कलह
    (C) किमान वेतन
    (D) कारखाने

11. खालीलपैकी कशाचा समावेश करिअर व्यूहरचनेची मांडणी करतांना केल्या जाणाऱ्या प्रारूपात होत **नाही** ?
    (A) व्यक्तीमत्त्वाच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे मूल्यमापन
    (B) करिअर नियोजनाची अंमलबजावणी
    (C) दीर्घकालीन व्यक्तिगत व व्यावसायिक ध्येय/उद्दिष्टे
    (D) व्यक्तिगत माहिती

12. Leading human resources is the process of influencing the activities of an individual or a group in efforts towards goal achievement in given .................. .

(A) Structure

(B) Situation

(C) Organisation

(D) Culture

13. Which of the following is *not* a principle of bank lending ?

(A) Collective responsibility

(B) Liquidity

(C) Security

(D) Profitability

12. एखाद्या .................. ध्येय/उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रयत्नात व्यक्ति किंवा समूहाच्या (गटाच्या) कार्यावर प्रभाव/परिणाम करण्याची प्रक्रिया म्हणजे मानवी संसाधनाचे नेतृत्व होय.

(A) आराखडा/रचनेचे

(B) परिस्थितीचे

(C) संघटनेचे

(D) संस्कृतीचे

13. खालीलपैकी कोणते तत्त्व बँक वित्तपुरठ्यातील **नाही** ?

(A) सामूहिक जबाबदारी

(B) रोखता तत्त्व

(C) सुरक्षितता तत्त्व

(D) लाभप्रदता तत्त्व

14. Which of the following is *not* induced in three pillars of BASEL capital accord ?
    - (A) Minimum capital requirement
    - (B) Supervisory review
    - (C) Market discipline
    - (D) Core banking solutions

15. What is full form of CTS ?
    - (A) Call Trade System
    - (B) Cheque Truncation System
    - (C) Cheque Transmission System
    - (D) Cheque Transport System

16. Which of the following sectors does *not* come under the perview of IDBI for term lending ?
    - (A) Defence equipments
    - (B) Informatics
    - (C) Health care
    - (D) Storage and distribution of energy

14. बेसल कराराच्या तीन स्तंभामध्ये खालीलपैकी कोणता घटक समाविष्ट केलेला **नाही** ?
    - (A) किमान भांडवल पर्याप्तता
    - (B) देखरेख आढावा
    - (C) बाजार शिस्तनियम
    - (D) कोअर बँकिंग सोल्युशन

15. CTS चे पूर्ण रूप द्या :
    - (A) कॉल ट्रेड सिस्टीम
    - (B) चेक ट्रंकेशन सिस्टीम
    - (C) चेक ट्रान्समिशन सिस्टीम
    - (D) चेक ट्रान्सपोर्ट सिस्टीम

16. IDBI च्या मुदती कर्जात खालीलपैकी कोणत्या क्षेत्राचा सहभाग नसतो ?
    - (A) संरक्षण उत्पादने
    - (B) माहितीक्षेत्र उत्पादने
    - (C) आरोग्यक्षेत्र उत्पादने
    - (D) उर्जा साठवणूक व वितरण उत्पादने

17. All those financial resources and facilities which are available to the monetary authorities of countries for solving their International disbursements are called as :

(A) Global funds

(B) International funds

(C) International liquidity

(D) International capital

18. Special Drawing Rights issued by IMF are components of :

(A) Foreign investment flows

(B) International liquidity

(C) International institutional investments

(D) International capital

17. देशातील चलन व्यवस्थांना आपली विदेशी देणी पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या वित्तीय साधने व सुविधांना :

(A) जागतिक निधी म्हणतात

(B) आंतरराष्ट्रीय निधी म्हणतात

(C) आंतरराष्ट्रीय तरलता म्हणतात

(D) आंतरराष्ट्रीय भांडवल म्हणतात

18. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून निर्मिलेले विशेष आहरण अधिकार (SDRs) हे खालीलपैकी याचा भाग आहेत :

(A) परकीय भांडवल प्रवाह

(B) आंतरराष्ट्रीय तरलता

(C) जागतिक संस्थात्मक गुंतवणुकी

(D) जागतिक भांडवल

19. Which of the following is *not* true with reference to WTO ?

(A) It is an organisation

(B) It is permanent in nature

(C) It has dispute settlement mechanism

(D) It deals with only trade in goods

19. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) संदर्भात खालीलपैकी कोणते विधान सत्य **नाही** ?

(A) ती एक संस्था आहे

(B) तिचे स्वरूप स्थायी आहे

(C) तंटा निवारण यंत्रणा तिचा एक भाग आहे

(D) फक्त वस्तू व्यापाराशी ती संबंधित आहे

20. The Asian Development Bank (ADB) is :

(A) Multilateral Trade Organisation

(B) Global Investment Organisation

(C) Regional Finance Institution

(D) Export Finance Bank

20. आशियाई विकास बँक (ADB) ही एक :

(A) बहुराष्ट्रीय व्यापार संघटना आहे

(B) जागतिक गुंतवणूक संस्था आहे

(C) विभागीय वित्त संस्था आहे

(D) निर्यात वित्त बँक आहे

21. Accounting Standard 28 is related with ................. .

(A) Cash flow statement

(B) Valuation of inventories

(C) Impairment of assets

(D) Earning per share

22. A department in which manager has control over revenues, expenses and investment in assets is called as .................... .

(A) Profit centre

(B) Cost centre

(C) Revenue centre

(D) Investment centre

21. लेखांकन मानक 28 हे याच्या निगडित आहे :

(A) रोख प्रवाह पत्रक

(B) मालसाठा मूल्यांकन

(C) मालमत्ता मूल्यघट

(D) प्रती भाग मिळकत

22. एखाद्या विभागात व्यवस्थापकास महसूल, खर्च व मालमत्तेत गुंतवणूक यावर नियंत्रण करण्याचा अधिकार असतो, त्यास ..................... असे म्हणतात.

(A) नफा केंद्र

(B) परिव्यय केंद्र

(C) महसूल केंद्र

(D) गुंतवणूक केंद्र

23. On listing of the Stock Exchange, securities can be made easily........... .

(A) Transferable

(B) Affordable

(C) Refundable

(D) Profitable

24. Open ended mutual funds are traded at their ................... .

(A) Net Asset Value

(B) Gross Asset Value

(C) Net Realisable Value

(D) Net Book Value

25. Which of the following is *not* a speculation in the stock exchange ?

(A) Bull

(B) Broker

(C) Bear

(D) Stag

23. भागभांडवल बाजारात नोंदीत केलेल्या रोख्यांची ................... असते.

(A) हस्तांतरणीयता

(B) परवडण्याजोगीता

(C) परतमिळणेयोग्यता

(D) लाभप्रदता

24. खुलेद्वार म्युच्युल फंडाचे व्यवहार ............. किंमतीत होतात.

(A) निव्वळ मालमत्ता मूल्य

(B) ढोबळ मालमत्ता मूल्य

(C) निव्वळ वसुलीशक्य मूल्य

(D) निव्वळ पुस्तकीय मूल्य

25. खालीलपैकी कोणता व्यवहार भाग भांडवल बाजारात वायदा-व्यवहार समजला जात **नाही** ?

(A) बुल (Bull)

(B) दलाल (Broker)

(C) बिअर (Bear)

(D) स्टॅग (Stag)

26. Commercial paper represents a financial instrument issued for the purpose of .................... .

(A) Project financing

(B) Leasing of a plant

(C) Working capital

(D) Import of capital goods

27. A factoring arrangement used in the international trade finance by exporter who export their goods is called ................... .

(A) Forfeiting factoring

(B) Limited factoring

(C) Conventional factoring

(D) Recourse factoring

26. वाणिज्यपत्र हे वित्तीय साधन म्हणून खालील हेतूने काढलेले असते :

(A) प्रकल्प वित्तीयकरण

(B) यंत्र भाडेपट्टा करार

(C) खेळते भांडवल

(D) भांडवली वस्तूंचे आयात

27. निर्यातदाराने आंतरराष्ट्रीय व्यापार वित्त संबंधात वस्तू निर्यातीदरम्यान फॅक्टरींगची व्यवस्था केली असल्यास, त्यास ................. असे म्हणतात.

(A) फॅक्टरींगचे जप्तीकरण

(B) मर्यादित फॅक्टरींग

(C) पारंपरिक फॅक्टरींग

(D) पुनर्प्रवेश फॅक्टरींग

28. Modern marketing concept is ............ oriented concept.

(A) Suppliers

(B) Consumers

(C) Dealers

(D) Distribution

28. आधुनिक विपणन संकल्पना ही .................. भिमुख संकल्पना आहे.

(A) पुरवठादार

(B) उपभोक्ता

(C) विक्रेता

(D) वितरक

29. Since the implementation of liberalisation policy in India, there has been a shift from ................ market situation to buyers' market situation in case of several types of consumer products.

(A) Private

(B) Public

(C) Sellers'

(D) Competitors'

29. भारतामध्ये उदारीकरणाच्या धोरणाच्या अंमल-बजावणीनंतर अनेक उपभोक्त्यांच्या वस्तूंच्या संदर्भात ............... बाजारपेठेकडून खरेदीदारांच्या बाजारपेठ अवस्थेमध्ये बदल झालेला आहे.

(A) खाजगी

(B) सार्वजनिक

(C) विक्रेत्यांच्या

(D) स्पर्धकांच्या

30. Patronage motive is a motive which induces a person to buy ............... .

(A) From a particular shop

(B) On the basis of product features

(C) On the basis of product pricing

(D) On the basis of product packaging

30. आश्रय हेतू हा असा हेतू आहे की ज्यानुसार एखादी व्यक्ती .................. खरेदी करते.

(A) विशिष्ट दुकानामधूनच

(B) वस्तू वैशिष्ट्यांच्या आधारावर

(C) वस्तू किंमतीच्या आधारावर

(D) वस्तू वेष्टणाच्या आधारावर

31. Discouraging the demand for a product or service is referred as ...................... .

(A) E-marketing

(B) Demarketing

(C) Remarketing

(D) Micro-marketing

31. एखाद्या वस्तूच्या किंवा सेवेच्या मागणीला प्रतिरोध करणे याला ...................... असे म्हणतात.

(A) इ–मार्केटिंग

(B) डीमार्केटिंग

(C) रीमार्केटिंग

(D) मायक्रो–मार्केटिंग

32. Green washing refers to outwardly adopting green acts with an underlying purpose of ................ .

(A) Satisfying the consumers

(B) Exploiting the employees

(C) Increasing the profit

(D) Decreasing the profit

33. While selling a motor car, the role of .................. in a family is the most important role for marketers.

(A) Initiator

(B) Influencer

(C) Decider

(D) User

32. ग्रीन वॉशिंग म्हणजे अंतर्गत हेतू ................ असा असताना वरवर मात्र हरित कृतींचा अवलंब करणे होय.

(A) ग्राहकांचे समाधान करणे

(B) कर्मचाऱ्यांचे शोषण करणे

(C) नफ्याची वृद्धी करणे

(D) नफ्यामध्ये घट करणे

33. मोटारकारची विक्री करताना विपणनकर्त्यांच्या दृष्टीने कुटुंबातील .................. याची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरते.

(A) अधिकर्ता

(B) प्रभावकर्ता

(C) निर्णयकर्ता

(D) उपभोक्ता

34. In case of marketing research, which of the following is *not* a source of secondary data ?

(A) Books and Periodicals

(B) Government Reports

(C) Internet Websites

(D) Telephonic Survey

35. Which of the following is *not* the advantage of recruitment from within ?

(A) Stability from continuity of employment ensured

(B) Creation of sense of security among employees

(C) Enhancing the general morale of employees

(D) Varied and broader experience

34. विपणन संशोधनासंदर्भात खालीलपैकी कोणता दुय्यम माहिती स्रोत **नाही** ?

(A) पुस्तके आणि नियतकालिके

(B) सरकारी अहवाल

(C) अंतर्जाल-संकेतस्थळे

(D) दूरध्वनीद्वारे सर्वेक्षण

35. खालीलपैकी कोणता पर्याय हा अंतर्गत भरतीचा फायदा **नाही** ?

(A) नोकरीच्या सातत्यापासून स्थैर्याची खात्री

(B) कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षिततेच्या भावनेची निर्मिती

(C) कर्मचाऱ्यांचे सर्वसाधारण मनोधैर्य वाढविणे

(D) विविध आणि व्यापक अनुभव

36. .................... may be defined as the amount for conveniences and necessaries of life that a worker obtains for a given period of his/her work.

(A) Real wage

(B) Living wage

(C) Fair wage

(D) Minimum wage

37. Usually Manpower Planning in the context of an enterprises human resources does not as such focus on .................... .

(A) Acquisition

(B) Utilisation

(C) Social skills

(D) Improvement

36. कामगाराला त्याने किंवा तिने केलेल्या ठरावीक काळातील कामासाठी जीवनावश्यक गरजा व सोई भागविण्यासाठी मिळालेली रक्कम म्हणजे .................. अशी व्याख्या करता येईल.

(A) वास्तव वेतन

(B) जीवन वेतन

(C) न्याय्य वेतन

(D) किमान वेतन

37. व्यवसाय संस्थेच्या मानवी संसाधनाच्या संदर्भात मनुष्यबळाच्या नियोजनाचा रोख ................ असतोच असे नाही.

(A) प्राप्ती/प्राप्त करणे

(B) वापर/उपयोग

(C) सामाजिक कौशल्य

(D) सुधारणा

38. Which one of the following is fast emerging as a very serious problem in the wider field of Human Resource Management ?

(A) Inadequacy of right type of manpower

(B) Employee alienation

(C) Lack of adequate professional approach

(D) Role of trade unions

39. Which one of the following is *not* a purpose of transfer ?

(A) To rectify erroneous placement

(B) To provide creative opportunity

(C) To satisfy the employee's desire

(D) To move the employee in the interests of his/her health &/or age

38. मानवी संसाधन व्यवस्थापनाच्या व्यापक क्षेत्रात खालीलपैकी कोणती अति गंभीर समस्या वेगाने उद्‌भवत आहे ?

(A) योग्य/रास्त प्रकारच्या मनुष्यबळाचा अपुरेपणा

(B) कर्मचाऱ्यांचा दुरावलेपणा

(C) पुरेशा व्यवसायिक दृष्टिकोनाचा अभाव

(D) कामगार संघटनांची भूमिका

39. खालीलपैकी कोणता बदलीचा हेतू **नाही** ?

(A) चुकीच्या नियुक्तीची दुरुस्ती

(B) सृजनशील/रचनात्मक कामाची संधी देणे

(C) कर्मचाऱ्याची इच्छा पूर्ण करणे

(D) कर्मचाऱ्याच्या आरोग्य किंवा वयाच्या हिताच्या दृष्टीने त्याला हलविणे

40. When an employee has few ............., he/she has high morale.

(A) Perceptions

(B) Frustrations

(C) Dissonances

(D) Failures

41. Find the odd one out :

Some of the types of formalised programmes of training are :

(A) Job Rotation

(B) Job Enlargement

(C) Job Enrichment

(D) Fulfilment of Esteem Needs

40. जेंव्हा कर्मचाऱ्याला किमान ................ असतात तेंव्हा तिचे/त्याचे मनोधैर्य उंचावलेले असते.

(A) जाणीवा (समज)

(B) नैराश्य

(C) प्रतिकूलता

(D) अपयश

41. विसंगत पर्याय ओळखा :

प्रशिक्षणीच्या औपचारिक कार्यक्रमाचे काही प्रकार पुढीलप्रमाणे आहे :

(A) कार्य परिचलन

(B) कार्य विस्तार

(C) कार्य समृद्धीकरण

(D) प्रतिष्ठेच्या गरजांची पूर्तता

42. IMF performs the role of :

(A) Granting soft loans to less developed countries

(B) Regulate international trade

(C) Promote private investments

(D) Promote exchange stability by establishing multilateral system of payment

43. To qualify for free trade or reduce tariff under NAFTA, the North American content in production value needs to be :

(A) 25%

(B) 75%

(C) 50%

(D) 40%

42. खालीलपैकी IMF ची भूमिका ही आहे :

(A) अल्पविकसित देशांना सवलतीची कर्जे देणे

(B) परकीय व्यापाराचे नियमन करणे

(C) खाजगी गुंतवणुकीस चालना देणे

(D) बहुराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करून चलनस्थैर्य साध्य करणे

43. नॅफ्टा कराराप्रमाणे मुक्त व्यापार किंवा कर सवलतीस पात्र होण्यासाठी सहभागी देशांच्या उत्पादन मूल्यात त्या देशांचा स्वतःचा वाटा :

(A) किमान 25 टक्के असला पाहिजे

(B) किमान 75 टक्के असला पाहिजे

(C) किमान 50 टक्के असला पाहिजे

(D) किमान 40 टक्के असला पाहिजे

44. If the rate of exchange is allowed to be freely determined by demand and supply in foreign exchange market, it is called as :

(A) Fixed Exchange Rate

(B) Gold Standard

(C) Flexible Exchange Rate

(D) Rigid Exchange Rate

45. Because of its low rate of interest and easy terms of repayment, IDA is nicknamed as :

(A) Friend of LDCs

(B) Soft loan corridor

(C) Soft loan window

(D) Soft banker

44. विनिमयाचा दर विनिमय बाजारातील मागणी व पुरवठ्याच्या शक्तींवर निर्धारित होत असल्यास त्याला असे म्हणतात :

(A) स्थिर विनिमय दर

(B) सुवर्ण प्रमाण

(C) बदलता विनिमय दर

(D) ताठर विनिमय दर

45. अतिशय अल्प व्याजदर व परतफेडीच्या सुलभ अटी यामुळे आंतरराष्ट्रीय विकास संघटनेस (IDA) खालीलपैकी या टोपणनावाने ओळखले जाते :

(A) अल्पविकसित देशांचा सखा

(B) सॉफ्ट लोन कॉरीडोर

(C) सॉफ्ट लोन विंडो

(D) सॉफ्ट बँकर

46. Which of the following is *not* a part of IMF member countries quota to the capital base of IMF ?
   (A) Contribution in widely accepted foreign currencies
   (B) SDRs
   (C) Member countries own currency
   (D) Gold

46. IMF च्या भांडवलात सभासद देशांच्या हिस्स्यांचा खालीलपैकी कोणता घटक एक भाग **नसतो** ?
   (A) सर्वस्वीकृत परकीय चलनांमधील अंशदान
   (B) विशेष आहरण अधिकार
   (C) सभासद देशांचे स्वत:चे चलन
   (D) सुवर्ण/सोने

47. Which of the following member countries was last to join SAARC ?
   (A) India
   (B) Afghanistan
   (C) Pakistan
   (D) Nepal

47. सार्क संघटनेत खालीलपैकी कोणता देश सर्वात शेवटी सहभागी झाला ?
   (A) भारत
   (B) अफगाणिस्तान
   (C) पाकिस्तान
   (D) नेपाळ

48. Which of the following statements is *true* ?

(A) WTO is replaced by GATT

(B) IMF is replaced by WTO

(C) GATT is replaced by WTO

(D) WTO is replaced by IMF

49. A status of foreign citizen working in India during the previous year for 180 days is ................. .

(A) Resident and ordinary resident

(B) Resident but not ordinary resident

(C) Non-Resident

(D) Foreign Citizen

48. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) WTO च्या जागी GATT अस्तित्वात आले

(B) IMF च्या जागी WTO अस्तित्वात आले

(C) GATT च्या जागी WTO अस्तित्वात आले

(D) WTO च्या जागी IMF अस्तित्वात आले

49. भारतात 180 दिवस निवास असणाऱ्या परदेशी नागरिकाचा निवासी दर्जा कोणता असतो ?

(A) निवासी व सर्वसाधारण निवासी

(B) निवासी पण सर्वसाधारण निवासी नसलेला

(C) अनिवासी

(D) परदेशी नागरिक

50. A motor car having 1800 cc engine capacity, provided by an employer to employee for official purposes only is valued as perquisite at :

(A) ₹ 2,400 p.m.

(B) ₹ 1,800 p.m.

(C) ₹ 600 p.m.

(D) Nil

51. Deduction U/S 80 TTA of Income Tax Act, 1961, towards interest on Saving Bank Account is limited to ............... .

(A) ₹ 30,000

(B) ₹ 1,000

(C) ₹ 10,000

(D) ₹ 3,000

50. मालकाने कर्मचाऱ्याला इंजीनाची 1800cc क्षमता असणारी मोटारकार पूर्णपणे व्यावसायीक वापरासाठी उपलब्ध करून दिली असल्यास त्याचे मूल्यांकन अधिलाभ म्हणून किती रक्कमेस करपात्र होईल ?

(A) ₹ 2,400 प्रतिमाह

(B) ₹ 1,800 प्रतिमाह

(C) ₹ 600 प्रतिमाह

(D) निरंक

51. आयकर कायद्यातील कलम 80 TTA नुसार बँकेतील बचत खात्यावर मिळणाऱ्या व्याजात जास्तीत जास्त एवढा वजावाट आहे :

(A) ₹ 30,000

(B) ₹ 1,000

(C) ₹ 10,000

(D) ₹ 3,000

52. Which of the following methods of depreciation is considered under the Income Tax Act 1961 for calculating depreciation allowance U/S 32 ?

(A) Straight line method

(B) Written down value method

(C) Revaluation method

(D) Insurance method

53. Which of the following is *not* capital asset under Income Tax Act, 1961 ?

(A) Agricultural land

(B) Urban land

(C) Forest land

(D) Industrial land

52. आयकर कायद्या 1961 तील कलम 32 नुसार घसाऱ्याची तरतूद करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या पद्धतीने घसारा भत्ता काढला जातो ?

(A) सरळ रेष पद्धत

(B) घटते मूल्य पद्धत

(C) पुनर्मूल्यांकन पद्धत

(D) विमा पद्धत

53. आयकर कायदा 1961 अनुसार खालीलपैकी कोणती भांडवली मालमत्ता **नाही** ?

(A) कृषी भूमी

(B) शहरी भूमी

(C) वन भूमी

(D) औद्योगिक भूमी

54. Non-disclosure of income from Benami transactions is an example of ................. .

(A) Tax planning

(B) Tax avoidance

(C) Tax evasion

(D) Tax exclusion

55. Income from Royalty U/S 80 RRB on text-book is eligible for deduction under Income Tax Act, 1961 :

(A) ₹ 1,00,000

(B) ₹ 2,00,000

(C) ₹ 3,00,000

(D) Nil

54. बेनामी व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न उघड न करणे हे खालील गोष्टीचे उदाहरण आहे :

(A) कर नियोजन

(B) कर टाळणे

(C) कर चुकविणे

(D) कर वगळणे

55. क्रमिक पुस्तकावर मिळणाऱ्या रॉयल्टीच्या रक्कमेची महत्तम वजावाट कलम 80 RRB अनुसार इतकी आहे :

(A) ₹ 1,00,000

(B) ₹ 2,00,000

(C) ₹ 3,00,000

(D) निरंक

56. Addition of a new product line in a company is .................... .

(A) Diversification

(B) Vertical integration

(C) Horizontal integration

(D) Geographic expansion

57. Which Act was replaced with the introduction of Competition Act 2002 ?

(A) FERA

(B) MRTP

(C) POTA

(D) FEMA

56. कंपनीमधे नवीन उत्पादन साखळीची वाढ करणे म्हणजे .................... .

(A) विविधीकरण

(B) ऊर्ध्वीय एकत्रीकरण

(C) आडवे (क्षितिजसमान) एकत्रीकरण

(D) भौगोलिक विस्तार

57. कॉम्पिटीशन अॅक्ट 2002 ह्या कायद्याने कोणत्या कायद्याची जागा घेतली ?

**किंवा**

कोणता कायदा कॉम्पिटीशन अॅक्टद्वारे कोणत्या कायद्याची जागा घेण्यात आली ?

(A) फेरा (FERA)

(B) एम. आर. टी. पी. (MRTP)

(C) पोटा (POTA)

(D) फेमा (FEMA)

58. ........................ is a single act of comparison and learning for organisational improvement.

(A) Benchmarking

(B) Feedback

(C) Ranking

(D) Job evaluation

59. Low income economies are sometimes referred to as ................ .

(A) First world economies

(B) Second world economies

(C) Third world economies

(D) Fourth world economies

58. .................. ही तुलना करण्याची व संघटनात्मक सुधारणा करण्यासाठी शिकण्याची एकमेव कृती आहे.

(A) उच्चकक्ष/प्रमाणक ठरविणे

(B) प्रतिसाद तपासणी/मागोवा

(C) गुणानुक्रम देणे

(D) कार्यमूल्यमापन

59. अल्प उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांना काही वेळेस ........................ म्हणून निर्देशित केले जाते.

(A) प्रथम जागतिक अर्थव्यवस्था

(B) द्वितीय जागतिक अर्थव्यवस्था

(C) तृतीय जागतिक अर्थव्यवस्था

(D) चतुर्थ जागतिक अर्थव्यवस्था

60. On retirement of a partner, continuing partners gain in terms of .................. ratio.

(A) Gaining

(B) Capital

(C) Profit sharing

(D) Sacrificing

61. Profit on re-issue of forfeited shares is transferred to .................. .

(A) Profit and Loss Account

(B) Capital Reserve Account

(C) Profit and Loss Appropriation Account

(D) General Reserve Account

60. भागीदार निवृत्त होतांना चालू राहिलेल्या भागीदारांना .................. गुणोत्तराने लाभ होतो.

(A) लाभी

(B) भांडवल

(C) नफा वाटप

(D) त्यागी

61. जप्त केलेल्या भागांच्या पुनर्विक्रीवरील नफा .................. यात वर्ग केला जातो.

(A) नफा व तोटा खाते

(B) भांडवल राखीव निधी खाते

(C) नफा व तोटा विनियोग खाते

(D) सामान्य राखीव निधी खाते

62. An investment centre can be evaluated by .................. .

(A) Profit

(B) Return on turnover

(C) Present value of investment

(D) Return on investment

63. The main purpose of cost accounting is to .................. .

(A) Assist the management in decision-making

(B) Maximise profits and minimise losses

(C) Comply the norms issued by the Government of India from time to time

(D) Prepare cost accounts in line with the accounting standards

62. गुंतवणूक केंद्राचे मूल्यमापन .................. ने केले जाते.

(A) नफा

(B) उलाढालीवरील परतावा

(C) गुंतवणुकीचे सांप्रदीक मूल्य

(D) गुंतवणुकीवरील परतावा

63. परिव्यय लेखांकनाचा प्रमुख हेतू .................. हा आहे.

(A) व्यवस्थापनाला निर्णय घेण्यासाठी मदत करणे

(B) महत्तम नफा आणि लघुत्तम तोटा

(C) भारत सरकारने वेळोवळी जाहिर केलेल्या निकषांची पूर्तता करणे

(D) लेखांकन मानकांशी सुसंगत पद्धतीने परिव्यय लेखे तयार करणे

64. An indifference curve is usually convex to the origin because of :

(A) Increasing marginal rate of substitution

(B) Diminishing marginal rate of substitution

(C) Constant marginal rate of substitution

(D) Variable marginal rate of substitution

65. (AC – AVC) × Output is :

(A) TC

(B) TFC

(C) TVC

(D) AFC

64. खालीलपैकी कोणत्या कारणामुळे समवृत्ती/तटस्थता वक्र हा सामान्यपणे आरंभ बिंदूला बहिर्गोल असतो ?

(A) वाढता सीमांत पर्यायता दर

(B) घटता सीमांत पर्यायता दर

(C) स्थिर सीमांत पर्यायता दर

(D) बदलता सीमांत पर्यायता दर

65. (सरासरी खर्च – सरासरी बदलता खर्च) × उत्पादन पातळी म्हणजे :

(A) एकूण खर्च

(B) एकूण स्थिर खर्च

(C) एकूण बदलता खर्च

(D) सरासरी स्थिर खर्च

66. The products sold by rival firms in monopolistic competition are :

(A) Perfectly complementary

(B) Perfectly substitutes

(C) Complementary

(D) Close substitutes

67. When AR of a firm is above its AC then :

(A) The firm will earn supernormal profits

(B) The firm will achieve break-even point

(C) The firm will earn normal profits

(D) The firm will suffer losses

66. मक्तेदारीयुक्त स्पर्धाबाजारातील स्पर्धक उद्योग-संस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तू हे पररस्परांना :

(A) पूर्णपणे पूरक असतात

(B) पूर्णपणे पर्यायी असतात

(C) पूरक असतात

(D) जवळच्या पर्याय असतात

67. उद्योगसंस्थेची सरासरी प्राप्ती (AR) तिच्या सरासरी खर्चापेक्षा (AC) जर अधिक असल्यास तर :

(A) उद्योगसंस्थेस अतिरिक्त/असाधारण नफा होईल

(B) उद्योगसंस्था ना नफा-ना तोटा अवस्था प्राप्त करेल

(C) उद्योगसंस्थेस सर्वसाधारण नफा मिळेल

(D) उद्योगसंस्थेस तोटा होईल

68. A study of entire population is called as .................... .

(A) Census

(B) Sample survey

(C) Pilot survey

(D) Random survey

69. If a random variable X follows Poisson distribution such that P (X = 1) = P (X = 2), then the mean of X is .................. .

(A) 1

(B) 2

(C) 3

(D) 4

68. संपूर्ण समष्टीचा अभ्यास म्हणजे ............... .

(A) प्रगणना

(B) नमुना सर्वेक्षण

(C) पथदर्शी सर्वेक्षण

(D) यादृच्छिक सर्वेक्षण

69. जर X या यादृच्छिक चलाचे वितरण पॉईसान असेल आणि P (X = 1) = P (X = 2), तर X चे मध्य ................ असते.

(A) 1

(B) 2

(C) 3

(D) 4

70. A certain quantity is a total of certain number of components then we use .................... diagram to represent it.

(A) Bar

(B) Line

(C) Pie

(D) Multiple bar

71. If P(A) = 5P(A'), then P(A) = ............ .

(A) 5

(B) 1/5

(C) 5/6

(D) 1/6

70. एखादी गोष्ट ही अनेक घटकांची बेरीज असेल तर त्यासाठी .................. आकृतीचा उपयोग करतात.

(A) स्तंभालेख

(B) रेखालेख

(C) पायचित्र

(D) बहुचल स्तंभालेख

71. जर P(A) = 5P(A'), तर P(A) = ............ .

(A) 5

(B) 1/5

(C) 5/6

(D) 1/6

72. .................. is a step in the process of controlling.

(A) Matching the actual performance with the standard set

(B) Developing feed forward control

(C) Organising delegation of authority

(D) Working out span of management

73. Decision-making requires :

(A) Designing organisation structure

(B) Decentralisation of authority

(C) Unity of command

(D) Planning

72. .................. हे नियंत्रण प्रक्रियेतील एक पायरी (टप्पा) आहे.

(A) प्रमाणित (प्रमाणकानुसार) कामगिरीशी प्रत्यक्षातील कामगिरी जुळवून पाहणे

(B) अग्रभरण नियंत्रण विकसित करणे

(C) अधिकार प्रदानाचे संघटन करणे

(D) व्यवस्थापनाची कक्षा ठरविणे/तयार करणे

73. निर्णय घेण्यासाठी ................ याची गरज असते.

(A) संघटन रचना (आराखडा) तयार करणे/बनविणे

(B) अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे

(C) आदेशाची एकात्मता

(D) नियोजन

74. Effective leadership particularly depends on :

(A) Organisation Structure

(B) Situation

(C) Span of Control

(D) Programme Design

75. Motivation does *not* necessarily depend on :

(A) Motive

(B) Superior

(C) Organisation structure

(D) Opportunity to fulfil social needs

74. परिणामकारक/प्रभावी नेतृत्व विशेषत: .......... यावर अवलंबून असते.

(A) संघटन रचना

(B) परिस्थिती

(C) नियंत्रण कक्ष

(D) कार्यक्रम रचना/आराखडा

75. कार्यप्रेरणा ही .............. यावर अवलंबून असते अशी आवश्यकता **नाही**.

(A) हेतू/प्रेरणा

(B) श्रेष्ठी/ज्येष्ठ अधिकारी

(C) संघटन रचना/आराखडा

(D) सामाजिक गरजा भागविण्याची संधी

**ROUGH WORK**

## ROUGH WORK